विस्तारित आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील संशयास्पद दाव्यांतील प्रत्यक्ष लाभार्थी पडताळणी करण्याकरिता **विशेष चौकशी पथक (SIT) गठीत करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक रोड,मुंबई ४००००१

शासन निर्णय क्रमांक : समिती-२०२६/प्र.क्र.११९/MJPJAY & AB-PMJAY/E-१७४८२७९

दिनांक : ०५ ऑगस्ट, २०२६

वाचा:-

१. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक मफुयो २०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६ दिनांक २८ जुलै, २०२३
२. शासन आदेश क्रमांक : मफुयो - २०२५/E -१२४९८८०/MJPJAY & AB-PMJAY दिनांक: २७ एप्रिल,२०२६
३. मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दि.१०.७.२०२६ रोजी आयोजित बैठकीतील निर्देश

प्रस्तावना :

विस्तारित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (AB -PMJAY) व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY)या योजनेतील सन २०२४ ते २०२६ या कालावधीतील सकृतदर्शनी विसंगती आढळलेल्या एकूण १५,४०७ प्रकरणांत उपचाराच्या दाव्यांची उपचार घेतलेल्या लाभार्थींना प्रत्यक्ष भेटून पडताळणी करण्याचे आदेश संदर्भ क्रमांक २ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांना देण्यात आले होते.

दरम्यान, सदर प्रकरणी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १० जुलै, २०२६ रोजी झालेल्या आढावा बैठकीत सदर योजनेतील कथित फसवणुकीचे प्रमाण व व्याप्ती एकापेक्षा जास्त जिल्ह्यांत असल्याने, सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केलेल्या १५,४०७ दावा प्रकरणांची तपासणी करण्यासाठी विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष चौकशी पथक (SIT) गठीत करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिले होते. त्यानुषंगाने विशेष चौकशी पथक (SIT) गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

विस्तारित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (AB -PMJAY) व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY)या योजनेतील सन २०२४ ते २०२६ या कालावधीतील सकृतदर्शनी विसंगती आढळलेल्या एकूण १५,४०७ प्रकरणांची चौकशी करण्याकरिता पुढीलप्रमाणे विशेष चौकशी पथक (एसआयटी Special Investigation Team) गठित करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव व पदनाम	चौकशी पथकातील पदनाम
१.	डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त,नाशिक , नाशिक	पथक प्रमुख
२.	श्री. ई. रविंद्रन , सचिव-२ , सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन	सदस्य
३.	श्री. विरेन्द्र सिंह, सचिव , इलेक्ट्रॉनिक्स,माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, महाराष्ट्र शासन	सदस्य
४.	पोलीस महासंचालक यांनी नामनिर्देशित केलेले सदस्य १)पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, नाशिक शहर २)सहायक आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा (EOW) नाशिक शहर	सदस्य
५.	उप सचिव (MJPJAY कार्यासन), सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन	सदस्य सचिव

यात्यतिरिक्त; सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी विशेष चौकशी पथकाच्या आवश्यकतेनुसार व त्यांच्या मागणीनुसार प्रकरणी सल्ला देण्याकरिता विभागातील तज्ञ डॉक्टरांच्या सेवा विशेष चौकशी पथकास वेळोवेळी उपलब्ध करून द्याव्यात.

२. विशेष चौकशी पथकाची (एसआयटी) कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील:

(१) विस्तारित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (AB -PMJAY) व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY)या योजनेतील सन २०२४ ते २०२६ या कालावधीतील सकृतदर्शनी विसंगती आढळलेल्या एकूण १५,४०७ दावा प्रकरणांमधील रुग्णालयस्तरीय अनियमितता जसे बनावट अथवा वैद्यकीयदृष्ट्या अनावश्यक दावे, उपचार प्रक्रियेचे अवाजवी श्रेणीवर्धन, अंगीकरण /नूतनीकरण प्रक्रियेतील अनियमितता , संशयास्पद दावा प्रकरणातील रुग्ण नोंदणी करताना अनधिकृत व्यक्ति/ मध्यस्थ यांचा

सहभाग, मोठ्या प्रमाणात नोंदणी, एकाच भ्रमणध्वनी क्रमांकाशी अथवा ओळखपत्र पुराव्याशी अनेक दावे संलग्न करणे, सदर अनियमितेमध्ये जिल्हा समन्वयक,योजनेच्या अंमलबजावणीकरिता नियुक्त करण्यात आलेल्या तृतीय पक्ष संस्था (Third Party Agency) अथवा योजनेशी संबंधित इतर घटकांचा संभाव्य सहभाग इत्यादि बाबींच्या अनुषंगाने चौकशी करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करणे,

(२) विस्तारित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (AB -PMJAY) व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) अंतर्गत रुग्णालयांचे अंगिकरण, दावा-मंजुरी व सनियंत्रण प्रक्रियेतील त्रुटींची निश्चिती करून त्यानुषंगाने करावयाच्या सुधारणात्मक उपाययोजनांची शिफारस करणे.

३. विशेष चौकशी पथकाने आपला अहवाल पथक गठित झाल्याच्या दिनांकापासून तीस (३०) दिवसांच्या आत शासनास सादर करावा.

४. सदर चौकशी कालावधीमध्ये विशेष चौकशी पथकाकडून केलेल्या मागणीनुसार मनुष्यबळ व तांत्रिक सहाय्य मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्या कार्यालयाकडून पुरविण्यात येईल. तसेच, विशेष चौकशी पथकाच्या दैनंदिन कामकाजावर होणारा खर्च राज्य आरोग्य हमी सोसायटीस प्रशासकीय खर्चासाठी मंजूर तरतुदींतून भागविण्यात येईल.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८०५११५७४८४३१७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHANDRAKANT ARUN VIBHUTE

Digitally signed by CHANDRAKANT ARUN VIBHUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=D772C1C0413F707CB062D972B2618CF3943831624F050BADD4BD9AEA24219790, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B37242131913CE4AD7FFA0CAA314C8163271F8AF6410B5DFF1FC5B4C3CC19B76, cn=CHANDRAKANT ARUN VIBHUTE
Date: 2026.08.05 13:29:36 +05'30'

(चंद्रकांत विभूते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,

२.मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई

३.मा.उप मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई

४.सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५.मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६.सर्व मा. संसद/ मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
७.मा.मुख्य सचिव , महाराष्ट्र राज्य
८.मा. पोलिस महासंचालक , महाराष्ट्र राज्य
९.सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई
१०.विभागीय आयुक्त (सर्व)
११.महालेखापाल-१/२(लेखा परीक्षा) (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१२.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४.आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
१५.मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई
१६.जिल्हाधिकारी (सर्व)
१७.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१८.संचालक, आरोग्य सेवा, पुणे/मुंबई
१९.उपसंचालक (सर्व) , आरोग्य सेवा
२०.जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
२१.जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
२२.सर्व कार्यासने, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय , मुंबई.
२३.निवडनस्ती, MJPJAY कार्यासन